# पदवी अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी ऑनलाईन सर्वेक्षण

प्रतिनिधी
कोल्हापूर

- परीक्षा ऑनलाईन की ऑफलाईनचा निर्णय होणार
- मोबाईल नंबर, ईमेल आयडी अपडेट करण्याचे आवाहन

शिवाजी विद्यापीठातील पदवी अंतिम सत्राच्या परीक्षा १० ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने घेण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. परंतु यापैकी कोणता पर्याय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सोयिस्कर ठरेल यासंदर्भात परीक्षा विभागाने ऑनलाईन सर्वेक्षण सुरू केले आहे.

बुधवारी विद्यापीठाची लिंक ओपन झाली आहे. या लिंकवर शनिवारपर्यंत विद्यार्थ्यांनी ऑप्शन फॉर्म भरावयाचे आहेत. या लिंकवर येणाऱ्या सूचनांचा अभ्यास करून परीक्षा कशी घ्यायची याचा अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील पदवी अंतिम वर्षाच्या नियमित आणि बॅकलॉगच्या परीक्षा ऑक्टोबरमध्ये होणार आहेत. या परीक्षा ७० हजार विद्यार्थी देणार आहेत. विद्यार्थ्यांना मोबाईल आणि ईमेल आयडी अपडेट करण्याचे आवाहन केले होते. ज्या विद्यार्थ्यांनी मोबाईल अपडेट केले आहेत त्यांच्या मोबाईलवर लिंक पाठवण्यात आली आहे. ज्या कंपनीची निविदा मंजूर केली जाणार आहे, त्या कंपनीचे सॉफ्टवेअर १ ऑक्टोबरपासून विद्यापीठाला प्राप्त होणार आहे.



## २०० पेक्षा जास्त परीक्षांसाठी लगबग

एक हजार विषयासाठी २०० पेक्षा जास्त परीक्षा घेण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे परीक्षा विभागाच्या वतीने क्वेश्चन बँक तयार करण्याचे काम सुरू आहे. परीक्षा विभागाकडे सध्या पुरक मनुष्यबळ आहे.

## लेखनीबंद आंदोलनाचे आव्हान

आजपासून राज्यभर विद्यापीठात कर्मचारी लेखनीबंद आंदोलन करणार आहेत. हे आंदोलन जास्त दिवस सुरू राहिले तर परीक्षा घेण्याचे आव्हान परीक्षा विभागासमोर असणार आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासन काय सोय करणार याकडे विद्यापीठ परिक्षेत्राचे लक्ष लागले आहे.